श्रीमद्भगवद्गीतेची यथावत सुबोध व्याख्या

भाग- १
इयत्ता १ ली ते ५ वी

# बाल गीता


## विश्वातील सर्व विद्यार्थ्यांसाठी




यथार्थगीतेचे रचनाकार-
स्वामी अड़गड़ानन्दजी महाराज

## ।। यथार्थ गीता ।।

मानवमात्राचे एकमेव धर्मशास्त्र




मुले व सर्व विद्यार्थी - गीता जाणण्यास खरे योग्य

| सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

|| ॐ श्री सद्‌गुरुदेवाय नमः ||

| भाग– १ |
| --- |
| इयत्ता १ ली ते ५ वी |

# बाल गीता

## विश्वातील सर्व विद्यार्थ्यांसाठी

मुलांमध्ये संस्कारांची वृद्धि होण्याच्या हेतूने

**पूज्य स्वामी श्री अड़गड़ानन्दजी महाराज**

ह्यांच्या श्रीमुखातून निघालेल्या

उपदेशक अमृतवाणीचे संकलन

*** मुले व सर्व विद्यार्थी-गीता जाणण्यास खरे योग्य ***

ॐ

प्रकाशक :

**श्री परमहंस स्वामी अड़गड़ानन्दजी आश्रम ट्रस्ट**

न्यू अपोलो स्टेट, गाळा नं. 5 अणि 11 मोगरा लेन,(रेलवे सब-वे च्या जवळ), अंधेरी पूर्व,

मुम्बई - 400069 भारत. फोन : (091-22) 2825 5300

प्रकाशक :
**श्री परमहंस स्वामी अड़गड़ानन्दजी आश्रम ट्रस्ट**
न्यू अपोलो स्टेट, गाळा नं. 5 अणि 11 मोगरा लेन,
(रेलवे सब-वे च्या जवळ), अंधेरी पूर्व,
मुम्बई ४०००६९, भारत.
फोन : (०९१-२२) २८२५ ५३००
फॅक्स : (०९१-२२)
ईमेल : contact@yatharthgeeta.com
वेबसाइट : www.yatharthgeeta.com

© प्रकाशक **श्री परमहंस स्वामी अड़गड़ानन्दजी महाराज**

प्रकाशन– ऑगस्ट २०१० ते मे २०११ - १५,००० प्रति
सप्टेंबर २०२० १०,००० प्रति

मूल्य– रु. 40./- मात्र

मुद्रक :
**जॅक प्रिण्टर्स प्रा.लि.**
जॅक कम्पाऊण्ड, दादोजी कोंडदेव क्रॉस लेन
भायखळा (पूर्व), मुम्बई - 400 027, भारत
फोन नं.- **(0091-22) 6734 3131**
वेबसाइट - www.jakprinters.com

ISBN: 81-89308-70-X

The illustrations and contents of this book have been complied to the best of our knowledge for the benefit of the general public. We have no intention to hurt any individual, institutions or religious belief at all. We do not take any responsibility for the above morally or legally.

All right reserved around the world. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system, or transmitted in any form, electronic, mechanical or otherwise, without the prior permission of the publishers.

# प्रकाशकाचे निवेदन

१९८३ साली गुरुपौर्णिमेला ईश्वरी प्रेरणेने प्रकट झालेल्या ‘यथार्थ गीते’ स भारतानेच नव्हे तर पूर्ण विश्वाने स्वीकारले. कोटयावधि लोक ह्या यथार्थ ज्ञानाने न्हाऊन निघत आहेत. ह्याच उद्देशाने शिक्षक, पालक, आणि भाविकांच्या आग्रहाखातर व पूज्य स्वामीजींच्या प्रेरणेने, लहान मुले तसेच विद्यार्थ्यांसाठी गीता-ज्ञानाच्या ह्या पुस्तिकेचे प्रकाशन केले गेले आहे, की जे केवळ भारतातीलच नव्हे तर साऱ्या विश्वातील भावी नागरिकांना आकर्षित करेल.

वस्तुतः गीतेमध्ये वापरलेले शब्द, यौगिक शब्द आहेत, त्यांचे स्वतःचे असे एक लालित्य आहे, सौंदर्य आहे; त्या शब्दांना बदलणे तर शक्य नाही. हां! परंतु त्यांना सरळ, सुबोध रुपामध्ये प्रस्तुत करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सर्व माता-पिता पालक तसेच शिक्षकवृंदाला ही विनंती आहे की, त्यांनी आपल्या मुलांना तसेच विद्यार्थ्यांना ईश्वरीय गायन ‘गीते’शी परिचित करावे. त्यांच्या शंकांचे तसेच जिज्ञासांचे निराकरण करावे, ज्यामुळे त्यांच्यामध्ये श्रेष्ठ संस्कारांचे सृजन होईल, त्यांच्या पुण्य-पुरुषार्थात वृध्दि होईल आणि जीवनातील प्रत्येक क्षेत्रात ते यश प्राप्त करतील.

आपणा सर्वांकडून ही अपेक्षा आहे की ही पुस्तिका आणि ‘यथार्थ गीता’ प्रत्येक घरात, शाळेत, वाचनालयात आणि प्रत्येक विद्यार्थ्याच्या दप्तरामध्ये असावी. वस्तुतः तमाम रूढि, अंधविश्वास तसेच पूर्वग्रहांपासून मुक्त असलेली मुलेच ‘गीता’ जाणण्यास खरी योग्य आहेत.

**ह्यासाठी नेम करूया की सर्व विद्यार्थी –**

- दररोज, सकाळी अथवा संध्याकाळी यथार्थ गीतेच्या चार श्लोकांचे चाल लावून अर्थासहित वाचन करतील.
- दर आठवडयाला एक श्लोक पाठ करतील.
- प्रत्येक आठवडयाला ‘यथार्थ गीता’ ह्यामधील तीन श्लोक वहीमध्ये लिहून आणतील.
- आठवडयातून एकदा एक तास ‘गीता ज्ञान सभेचे’ आयोजन करून यथार्थ गीतेच्या श्लोकांचे अर्थासहित सामूहिक वाचन व चर्चा करतील. शिक्षक व पालक त्यांच्या शंकांचे निरसन करतील.

मुलांच्या वाढदिवसाला, मंगल कार्यांमध्ये व शाळांमध्ये मुक्तहस्ताने ह्या पुस्तिकेचे वितरण करावे. ह्यामुळे मुलांवर तर चांगले संस्कार होतीलच पण त्याचबरोबर आपलेही कल्याण होईल.

आपल्या सर्व मुलांना व विद्यार्थ्यांना प्रकाशकांतर्फे शुभेच्छा.

**– प्रकाशक**

# संबोधन

## विश्वाचे आदि धर्मशास्त्र - श्रीमद्भगवद्गीता

प्रिय मुलांनो,

आपण जाणण्यास उत्सुक असाल की 'गीता' कोठे प्रगट झाली. संपूर्ण विश्वाला समान शांतता, समृद्धि, संप्रदाय व भेदभावापासून मुक्तता, बंधुभाव-स्नेह-सन्मान आणि परमपद, प्रदान करणाऱ्या 'गीते' ची उत्पत्ति भारतात झाली.

सृष्टीच्या आरंभी कोट्यावधि वर्षांपूर्वी हिमालयाच्या तपोभूमीवर भगवान नारायणाने ही प्रथम सूर्याला सांगितली. सूर्यापासून महाराज मनूला ती प्राप्त झाली. मनूने इक्ष्वाकुला सांगितली आणि इक्ष्वाकुकडून राजर्षिंनी जाणली. त्या महत्वपूर्ण काळानंतर हा अविनाशी योग ह्या भूतलावरून लुप्त होत चालला होता. परंतु अविनाशीचा तर विनाश होत नाही, केवळ विस्मरण झाले होते. तोच योग भगवान श्रीकृष्णाने द्वापारमध्ये महाभारतात वर्णिलेल्या कुरुक्षेत्राच्या रणभूमीवर आपला सखा-मित्र-शिष्य असलेल्या अर्जुनास सांगितला.

मुलांनो, काही कालावधीनंतर तेच आदिशास्त्र 'गीता' आज आपल्या मूळ आशयाला सुरक्षित ठेऊन आपल्या समक्ष आहे, आपल्या हातात आहे. ह्या अनुपम, दुर्लभ शास्त्राचे जन्म-स्थान भारतच आहे. म्हणूनच हा भारताचा राष्ट्रीय दर्शन ग्रंथ आहे आणि विश्वातील मानवाला संबोधित असल्या कारणाने हा आंतरराष्ट्रीय ग्रंथही आहे.

तेव्हा, अनादिकाळापासून त्या एका परमपित्या परमात्म्याचा साक्षात्कार आणि त्यास धारण करण्याच्या विधि-विशेषांनी युक्त असलेली श्रीमद्भगवद्गीताच विश्वाचे आदि धर्मशास्त्र आहे. जे त्या परमात्म्याच्याच श्रीमुखातून निघालेले प्रसारण आहे.

सुख, शांति, समृद्धि व सफलतेची साधना म्हणजे गीता!

— स्वामी श्री अड़गड़ानन्दजी

# अनुक्रमणिका


| | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रार्थना. | १ |
| २. | वन्दना. | २ |
| ३. | आशीर्वचन | ३ |
| ४. | विश्वविश्रुत (विश्वविख्यात) गीतेवर विद्वानांचे विचार. | ४ |
| ५. | 'गीता' आणि भारतातील स्वातंत्र्य लढा. | ७ |
| ६. | 'गीते' वर राष्ट्रपिता महात्मा गांधींचे विचार. | ८ |
| ७. | ज्ञानामृत गीतेचा प्रादुर्भाव - महाभारत कथा. | ९ |
| ८. | श्रीमद्भगवद्गीता. | १५ |
| ९. | 'गीते' ची यथावत् सुबोध मराठी व्याख्या 'यथार्थ गीता'. | १७ |
| १०. | 'यथार्थ गीते' चे रचनाकार. | १९ |
| ११. | गीतेतील मुख्य सिद्धांत. | २० |
| १२. | वैचारिक मुद्दे. | २२ |
| १३. | विद्यार्थ्यांचे कर्तव्य. | २४ |
| १४. | गुरुमहिमा व गुरु-शिष्य परंपरा. | २६ |
| १५. | गौरवशाली ऐतिहासिक ग्रंथ 'महाभारत'. | २७ |
| १६. | महाभारत व गीतेतील उपदेशक प्रेरणादायी प्रसंग– | |
| | ❑ सफलतेचा नियम, | ३१ |
| | ❑ शिक्षणामध्ये प्रेरणा व चिकाटीचे महत्व, | ३२ |
| | ❑ गृहपाठ (होमवर्क) मनापासून व समजून पूर्ण करावा, | ३३ |
| | ❑ काल्पनिक भूत-प्रेतांचे अस्तित्व नसते, तर भिती कसली? | ३४ |
| | ❑ एका परमेश्वराचीच पूजा केली पाहिजे, | ३५ |
| | ❑ स्वार्थ आणि खोटेपणाचा परिणाम. | ३६ |


॥ ॐ ॥

## ॐ चा महिमा

ॐ नाम के साबुन से, जो मन का मैल छुड़ायेगा।
निर्मल मन के मंदिर में, भगवान् का दर्शन पायेगा।।

ओम् च्या उच्चारणाने मन शांत होते आणि शक्ति, साहस व सामर्थ्य प्राप्त होते, तसेच परमदेव परमात्म्याच्या निकट असल्याची अनुभूति मिळते.

- निराशा, असफलता आणि विपत्ति मध्ये इष्ट स्वरूपाचे ध्यान आणि ॐ चा जप करावा

* * *

## गीता-महिमा

गीतायाः श्लोकपाठेन गोविन्दस्मृतिकीर्तनात्।
साधुदर्शनामात्रेण तीर्थकोटिफलं लभेत्।।

गीतेतील श्लोकांच्या पाठांतराने, भगवान श्रीकृष्णांच्या स्मरणाने आणि भजनाने (ओम् चा जप) तसेच संतांच्या केवळ दर्शनाने कोटयावधि तीर्थक्षेत्रांचे पुण्य प्राप्त होते.

ॐ शान्तिः! शान्तिः!! शान्तिः!!!

॥ ॐ श्री परमात्मने नमः ॥

# प्रार्थना



## हे प्रभो ! आनन्ददाता !

हे प्रभो! आनन्ददाता! ज्ञान हमको दीजिये ।
शीघ्र सारे दुर्गुणों को, दूर हमसे कीजिये ॥
लीजिये हमको शरण में, हम सदाचारी बनें ।
ब्रह्मचारी, धर्मरक्षक, वीर व्रतधारी बनें ॥
निन्दा किसी की हम किसी से, भूलकर भी ना करें ।
ईर्ष्या कभी भी हम किसी से, भूलकर भी ना करें ॥
सत्य बोलें, झूठ त्यागें, मेल आपस में करें ।
दिव्य जीवन हो हमारा, यश तेरा गाया करें ॥
मातृभूमि पितु-मातु सेवा, हो अधिक प्यारी हमें ।
देश की सेवा करें, निज देश हितकारी बनें ॥
कीजिये हम पर कृपा, ऐसी हे परमात्मा ।
मोह मद मत्सर रहित, होवे हमारी आत्मा ॥
प्रेम से हम गुरुजनों की, नित्य ही सेवा करें ।
प्रेम से परमात्मन्! हम आपका चिन्तन करें ॥
योगविद्या ब्रह्मविद्या, हो अधिक प्यारी हमें ।
ब्रह्मस्थिति प्राप्त करके, सर्वहितकारी बनें ॥



॥ ॐ ॥

॥ॐ श्री सद्‌गुरुदेवाय नमः॥

# प्रार्थना

त्वमेव माता च पिता त्वमेव,
त्वमेव बन्धुश्च सखा त्वमेव।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव,
त्वमेव सर्वं मम देवदेव॥

अर्थ– तुम्हीच माता आहात, तुम्हीच पिता आहात, तुम्हीच बंधु आहात, तुम्हीच सखा आहात, तुम्हीच विद्या आहात, तुम्हीच सामर्थ्य आहात. हे देवाधिदेवा! सद्‌गुरुदेवा! तुम्हीच माझे सर्वस्व आहात.



गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः।
गुरुर्साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः॥

अर्थ– गुरुच ब्रह्मा आहेत (सृष्टीचे रचनाकार आहेत), गुरुच विष्णु आहेत (विश्वातील अणु-रेणुंमध्ये, कणा-कणांमध्ये व्याप्त आहेत),गुरुच महेश्वर आहेत (महान ईश्वर, परमात्मा आहेत) तसेच गुरुच साक्षात् साकार ब्रह्मस्वरूप आहेत, अर्थात ह्या सर्वांना प्राप्त करण्याचे साधन (जागृति) व माध्यम सद्‌गुरुच आहेत. मी त्या गुरुदेवांना नमस्कार करतो.

ध्यानमूलं गुरोर्मूर्तिः पूजामूलं गुरोर्पदम्।
मंत्रमूलं गुरोर्वाक्यं मोक्षमूलं गुरोर्कृपा॥


अर्थ– गुरूंच्या स्वरूपाचेच ध्यान,गुरूंच्या श्रीचरणांचीच पूजा, गुरुदेवांच्या श्रीमुखातून निघालेले शब्दच मंत्र आहेत, तसेच गुरूंची कृपा हाच मोक्षाचा आधार आहे.

# आशीर्वचन

**प्रिय विद्यार्थ्यांनो!**

तुमच्या जीवनातील हा सर्वात महत्वपूर्ण व ऐतिहासिक क्षण आहे, कारण आता तुम्ही 'गीते' शी परिचित होणार आहात. 'गीता' ज्ञानाचा सागर आहे आणि ईश्वरीय गायनाचे आदिशास्त्र आहे. सृष्टीच्या प्रारंभापासून प्रसारित झालेले गीता-ज्ञान हे विश्वातील मानवतेची सर्वात पहिली आणि प्राचीन अमूल्य ठेव आहे.

अनादिकाळापासून गीतेने सत्यशोधकांच्या तसेच जिज्ञासूंच्या सर्व प्रश्नांचे निराकरण केले आहे आणि आजही करत आहे. तुमच्या डोक्यातही उठणाऱ्या सर्व प्रश्नांचे जसे ही सृष्टि कशी निर्माण झाली? तिचा कर्ता कोण? माझ्या जन्माचे आणि जीवनाचे उद्देश्य काय आहे? अशा अनेक जीवसृष्टी, ब्रह्मांड आणि अध्यात्माशी संबंधित सर्व शंकांचे व प्रश्नांचे उत्तर 'गीते' मध्ये आहे.



काही कालावधीनंतर गीतेचा मूळ आशय 'हरवला' गेला. ५२०० वर्षांनंतर योगेश्वर श्रीकृष्णांचा आशय जसाच्या तसा 'यथार्थ गीते' मध्ये प्रस्तुत केला आहे. 'यथार्थ गीते' च्या प्रसारणाने धर्म आणि धर्माच्या नावावर निर्माण झालेल्या सर्व वाईट रीति, रूढि आणि अंधविश्वासाचे निराकरण करून ईश्वर प्राप्तीच्या समग्र साधन - पद्धतीला पुनर्प्रकाशित केले गेले आहे.

प्रिय विद्यार्थ्यांनो! गीतेचे अनुसरण आणि नियमित अध्ययन करून तुम्ही तुमच्या जीवनातील सर्व उद्दिष्टे पूर्ण करू शकाल. उपयुक्त शिक्षण, उत्तम मिळकत, सुख-समृद्धि, ऐश्वर्य आणि विभूति तुम्हाला वरेल आणि आध्यात्मिक मार्गावर क्रमाने उन्नति होत मोक्षही प्राप्त होईल. आपणा सर्व मुलांचे आश्रमात स्वागत आहे. विश्वातील सर्व भावी नागरिकांना आव्हान आहे की 'यथार्थ गीते' द्वारा त्यांनी विश्वामध्ये शांतता आणि 'वसुधैवकुटुम्बकम्' या विचाधारेला साकार करावे.

आपले जीवन मंगलमय होवो!

**– स्वामी श्री अड़गड़ानन्द जी**


श्री गुरु पौर्णिमा, १८ जूलै, २००८.
श्री परमहंस आश्रम, ग्रा. व पो.– शक्तेषगढ़,
चुनार – मिर्जापुर (उ. प्र.)

# विश्वविश्रुत 'गीता'

**विद्यार्थ्यांनो!**

**गीतेचा परिचय करून घेण्याआधी ह्या विश्वविश्रुत (विश्वप्रसिद्ध) दिव्य ज्ञानावर लोकांचे काय विचार आहेत ते जाणून घेऊ या.**

**भारतीय धर्म, दर्शन, संस्कृति म्हणजेच 'गीते' वर जगातील संत, दार्शनिक व इतिहासकारांचे विचार.**



- भगवद्‌गीता विश्वातील सर्वात सुंदर आणि महान ज्ञानाची दार्शनिक कृति आहे.

– डब्लू.वान.हम्बोल्ड (जर्मन विद्वान)

- पूर्वेकडच्या जगतामधील सर्व स्मरणीय वस्तूंमध्ये 'भगवद्‌गीते' पेक्षा श्रेष्ठ कोणतीही रचना नाही. गीतेबरोबर तुलना करता जगातील आधुनिक समस्त ज्ञान मला तुच्छ वाटते. मी नेहमी प्रातःकाळी माझ्या हृदयाला आणि बुद्धीला गीतारुपी पवित्र जलाने स्नान करविते.




- प्राचीन युगातील सर्वोत्तम गोष्टींमध्ये 'गीते'पेक्षा श्रेष्ठ काहीही नाही. 'गीते'मध्ये असे उत्तम व सर्वव्यापी ज्ञान आहे की त्याच्या रचनेनंतर इतक्या वर्षात एकही तसाच दुसरा ग्रंथ लिहिला गेला नाही.

– महात्मा थोरो (अमेरिकन दार्शनिक)



- 'गीता' हा जगातील उत्कृष्ट असा ज्ञानाचा नजराणा आहे. जगातील सर्व धार्मिक मतमतांतरांचे सार ह्या एका पुस्तकात पहायला मिळते.

– अलबेरुनी (अरबी विद्वान)




- 'आम्ही भारतीय दर्शनशास्त्राचे आणि ज्ञानाचे सदा ऋणी राहू. भारतानेच आम्हाला गणना शास्त्र शिकविले आणि शून्याची (zero) माहिती दिली. त्याशिवाय कोणताही वैज्ञानिक शोध लागू शकला नसता.'

– अलबर्ट आईनस्टईन (अमेरिकन वैज्ञानिक)

* धर्माच्या बाबतीत अन्य सर्व देश निर्धन आहेत तर भारत ह्यामध्ये शिरोमणि आहे.

– मार्क ट्वेन (अमेरिकन विद्वान)






* 'भारत' आपल्या मानवजातीची मातृभूमि आहे व संस्कृत भाषा युरोपातील सर्व भाषांची जननी आहे. ती आपल्या वेदान्तशास्त्र, गणित, विज्ञान, स्वराज्य तसेच जनतंत्राची जननी आहे. भारतदेश आमची माता आहे.

– बिलड्राण्ट (अमेरिकन इतिहासकार)

* जर मला विचारले की ह्या पृथ्वीवर पूर्ण विकसित मानव ज्ञान कोठे आहे? कोणी जीवनातील गूढ प्रश्नांवर गहन विचार करून त्यांची उत्तरे शोधून काढली आहेत? तर मी भारताचे नाव घेईन.

– मैक्समूलर (जर्मन दार्शनिक)





* ज्या मनुष्याने गीतेचे थोडे जरी अध्ययन केले असेल तरी तो संसार बंधनातून मुक्त होऊन अत्यंतिक आनंदाचा अधिकारी बनतो.

– जगद्गुरु श्री आदिशंकराचार्य

* मी युरोप आणि अशियातील सर्व धर्मांचे अध्ययन केले आहे, परंतु ह्या सर्वांमध्ये मला हिंदू धर्मच श्रेष्ठ वाटतो. मला विश्वास आहे की त्याच्या समोर सर्व जगाला नतमस्तक व्हावे लागेल.

– रोमां रोलां (फ्रेंच विद्वान)





* 'गीता' एक असा पुष्पगुच्छ आहे की ज्यामध्ये वेद आणि उपनिषदांमधील सर्व आध्यात्मिक ज्ञानपुष्पे सजलेली आहेत.

– स्वामी विवेकानंद (भारत)

- "The most beautiful, perhaps the only true philosophical song existing in any known tongue."

  **- Wilhelm Von Humboldt**

- "In the morning I bathe my intellect in the stupendous and cosmogonal philosophy of the *Bhagavad Gita,* since whose composition years of the gods have elapsed and in comparison with which our modern world and its literature seems puny and trivial."

  **- Henry David Thoreau**

- "I owed a magnificent day to the *Bhagavat-Gita.* It was the first of books; it was as if an empire spake to us, nothing small or unworthy, but large, serene, consistent, the voice of an old intelligence which in another age and climate had pondered and thus disposed of the same questions that exercise us."

  **- Ralph Waldo Emerson**

- "India was the motherland of our race, and Sanskrit the mother of Europe's languages: she was the mother of our philosophy; mother, through the Arabs, of much of our mathematics; mother, through the Buddha, of the ideals embodied in Christianity; mother, through the village community, of self-government and democracy. Mother India is in many ways the mother of us all. "

  **- Will Durant (American Historian)**

- "We owe a lot to the Indians, who taught us how to count, without which no worthwhile scientific discovery could have been made!"

  **- Albert Einstein (American Scientist)**

- "If I were asked under what sky the human mind has most fully developed some of its choicest gifts, has most deeply pondered over the greatest problems of life, and has found solutions of some of them which well deserve the attention even of those who have studied Plato and Kant, I should point to India."

  **- Max Mueller (German Scholar)**

- "If there is one place on the face of earth where all the dreams of living men have found a home from the very earliest days when man began the dream of existence, it is India."

  **- Romain Rolland (French Nobel Laureate)**

- "So far as I am able to judge, nothing has been left undone, either by man or nature, to make India the most extraordinary country that the sun visits on his rounds. Nothing seems to have been forgotten, nothing overlooked."

  **- Mark Twain**

**प्रिय मुलांनो,** आपण पाहिले की विश्वविख्यात 'गीता' ही ज्ञानाचा अगाध सागर आहे आणि त्याने प्राचीन काळापासून आजपर्यंतच्या सर्व मानव पिढयांना प्रभावित केले आहे, मार्गदर्शन केले आहे. आपणही भाग्यवान आहात की ह्या गौरवास्पद-ग्रंथ गीतेशी आपला परिचय होणार आहे.

* * *

# ‘गीता’ आणि भारताचा स्वातंत्र्य लढा

प्रिय मुलांनो!

भारताच्या स्वातंत्र्य लढयातील सैनिकांचे प्रेरणास्थानही ‘गीता’ च होते. लोकमान्य टिळक, वीर सावरकर, महर्षि अरविंद घोष, रामप्रसाद बिस्मिल, लाला लजपतराय, चंद्रशेखर आझाद, सुभाषचंद्र बोस इत्यादि सर्व थोर पुरुष गीतेने प्रेरित झाले होते. मंगल पांडे, खुदीराम बोस, सरदार भगत सिंग, राजगुरु, सुखदेव इत्यादि देशभक्त हसत-हसत फासावर चढले. त्या सर्वांच्या हातात गीता होती आणि मुखात होते –


लोकमान्य बाळगंगाधर टिळक


सुभाषचन्द्र बोस


चन्द्रशेखर आझाद


लाला लाजपत राय

वासांसि जीर्णानि यथा विहाय
नवानि गृह्णाति नरोऽपराणि।
तथा शरीराणि विहाय जीर्णा-
न्यन्यानि संयाति नवानि देही।।

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः।
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः।।
अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च।
नित्यः सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनः।।

(गीता, २/२२-२४)

अर्थात्, आमचे शरीर एक वस्त्र आहे, वस्त्र बदलून आम्ही पुन्हा येऊ आणि लढू. तुम्ही आमच्या आत्म्याला मारू शकत नाही. आत्म्याला शस्त्राने कापता येत नाही, अग्नि, जल आणि वायु त्यास जाळू शकत नाही, ओले करू शकत नाही आणि सुकवूही शकत नाही. हा आत्मा सर्वव्यापक, अचल, स्थिर रहाणारा आणि सनातन आहे.

* * *




# 'गीते' बद्दल महात्मा गांधीजींचे विचार

● 'गीते'च्याच आधाराने गांधीजींनी भारताला स्वतंत्र केले आणि स्वतःला राष्ट्रपिता ही पदवी प्राप्त केली. जेव्हा कधी जीवनात ते हताश अथवा निराश व्हावयाचे तेव्हा 'गीते'चा आश्रय घेऊन ते पुन्हा उत्साहित व्हायचे.

● 'गीता' माझी माता आहे. 'गीता' माझे बायबल वा कुराणच नाही तर प्रत्यक्ष माता आहे. 'गीता 'जगत्-जननी आहे, ती सर्वांना तृप्त करते.'

● 'माझी तर इच्छा आहे की 'गीता' केवळ राष्ट्रीय शाळांमध्येच नव्हे तर प्रत्येक शिक्षण संस्थांमध्ये शिकवली जावी. कोणत्याही हिंदू मुलाला अथवा मुलीला 'गीता' माहीत नसणे ही शरमेची गोष्ट वाटली पाहिजे. हे सत्य आहे की 'गीता' विश्वधर्माचे एक पुस्तक आहे.'

* * *





|| ॐ श्री परमात्मने नमः ||

# ज्ञानामृत 'गीते'चा प्रादुर्भाव





प्रिय विद्यार्थ्यांनो!

जवळजवळ ५२०० वर्षांपूर्वी महर्षि वेदव्यासांनी संस्कृत मध्ये रचलेले 'महाभारत' हे विश्वातील श्रेष्ठ महाकाव्य आहे, जे भारतातीलच नव्हे तर जगातील सर्व प्रचलित भाषांमध्ये अनुवादित आहे. एक लाख श्लोकांच्या महाभारतात अध्याय सहा 'भीष्मपर्व' मध्ये भगवान श्रीकृष्णाच्या वाणीस महर्षि वेदव्यासांनी वेगळे 'श्रीमद्भवगद्गीते'च्या रुपात संकलित केले.

चला ! थोडक्यात आपण महाभारत आणि त्यातील महानायक, गीता-प्रदाता भगवान् श्रीकृष्णांच्या बद्दल जाणून घेऊया.

## || महाभारत कथा ||

प्राचीनकाळी ययाति नावाचा मोठा पराक्रमी राजा राज्य करत होता. त्याच्या दोन राण्या होत्या- देवयानी आणि शर्मिष्ठा. देवयानीला दोन पुत्र होते- यदु आणि तुर्वसु. यदुच्या नावावरून यदुवंशी राजांची परंपरा चालू झाली. ह्याच वंशात पुढे श्रीकृष्ण जन्मले.

दुसरी राणी, शर्मिष्ठा हिच्या तीन पुत्रांमध्ये पुरु सर्वात लहान, बुध्दीमान आणि महान पराक्रमी होता. ययातीने त्यासच आपला उत्तराधिकारी बनवले. ह्याच चंद्रवंशातील राजा




दुष्यंताचा पुत्र भरत. (भरताच्या नावावरून ह्या देशाला भारत हे नाव पडले.) राजा भरताच्या वंशामध्ये हस्तिन नावाचा राजा झाला ज्याने हस्तिनापूरची स्थापना केली (दिल्लीच्या जवळ). ह्याच वंशात पुढे कुरु नावाचा राजा झाला ज्याच्यामुळे ह्या वंशाला कौरववंश हे नाव पडले.

आजपासून जवळजवळ ५४०० वर्षांपूर्वी हस्तिनापूरच्या विशाल साम्राज्यावर कौरववंशातील राजा शांतनु राज्य करत होता. त्याला दोन राण्या होत्या. पहिली राणी गंगादेवी व तिचा पुत्र देवव्रत, जो भीष्म ह्या नावाने ओळखला जातो. दुसरी राणी दासकन्या मत्स्योदरी होती, जी लग्नानंतर सत्यवती म्हणून ओळखली गेली. 'मी आजीव ब्रह्मचारी राहीन ज्यामुळे राणी सत्यवतीचा पुत्रच राज्याचा उत्तराधिकारी होईल' - अशा भीष्मप्रतिज्ञेनंतर सत्यवतीचे लग्न झाले. ह्या प्रतिज्ञेनंतरच देवव्रत भीष्म म्हणून ओळखले गेले व आजीवन ब्रह्मचर्य पत्करुन ते कौरव वंशाचे रक्षण करत राहिले.

राणी सत्यवतीला दोन पुत्र झाले – चित्रांगद आणि विचित्रवीर्य. निपुत्रिक चित्रांगदाच्या मृत्यूनंतर भीष्माने विचित्रवीर्यास सिंहासनावर बसवले आणि त्याचे लग्न काशीनरेश 'काशिराज' ह्याच्या कन्या 'अम्बिका' आणि 'अम्बालिका' ह्यांच्याबरोबर लावले. महर्षि वेदव्यासांच्या आशीर्वादाने अम्बिकेला धृतराष्ट्र व अम्बालिकेला पांडू नावाचे पुत्र





झाले आणि अम्बालिकेच्या दासीनेही एका पुत्रास जन्म दिला, ज्याचे नाव विदुर होते. धृतराष्ट्राचा विवाह गांधार देशाची राजकन्या गांधारीशी झाला. पांडूचा विवाह कुंतीभोज राजाची कन्या कुंती आणि मद्रदेशाची राजकुमारी माद्री ह्यांच्याशी झाला. धृतराष्ट्र जन्मतःच आंधळे होते, म्हणून पितामह भीष्मांनी पांडूला राजसिंहासनावर बसवले आणि विद्वान विदुराला मुख्यमंत्री बनवले.

गांधारीला दुर्योधन, दुःशासन, दुःसह इत्यादि शंभर पुत्र आणि दुःशाला नावाची एक कन्या होती. हे सर्व भाऊ कौरव ह्या नावाने प्रसिध्द झाले.

कुंतीला युधिष्ठिर, भीम व अर्जुन असे तीन पुत्र तर माद्रीला नकुल व सहदेव असे दोन पुत्र झाले. पांडूचे पुत्र असल्याने हे पाच भाऊ 'पांडव' म्हणून ओळखले गेले. हे पाचही भाऊ शूर, पराक्रमी व शीलवान होते.

सर्व कौरव व पांडव मिळून एकत्र गुरु कृपाचार्यांकडे विद्या ग्रहण करीत होते. नंतर भीष्माच्या आग्रहावरून गुरु द्रोणाचार्यांकडे हे सर्व राजकुमार धनुर्विद्या शिकले. सर्वांमध्ये धनुर्विद्येत अर्जुन, तर गदायुध्दात भीम व दुर्योधन निपुण होते.

काही वर्षे राज्य केल्यावर पांडू मरण पावला. पांडव राजसिंहासनाचे स्वाभाविक उत्तराधिकारी होते, परंतु दुर्योधनास ही गोष्ट पसंत नव्हती. पुत्र मोहामध्ये आंधळ्या झालेल्या धृतराष्ट्राचीही इच्छा होती की हे राज्य त्याचा पुत्र दुर्योधन ह्यास मिळावे.

धृतराष्ट्राचे पुत्र कौरव हे पांडवांचा द्वेष करू लागले आणि त्यांना वेग-वेगळ्या प्रकारे त्रास देऊ लागले. त्यांनी भीमाला विष दिले, लाक्षागृह तयार करून कुंतीसहित पाचही पांडवांना जाळण्याचा प्रयत्न केला. वैरभाव वाढत गेला. शेवटी पितामह भीष्मांच्या सांगण्यावरुन कुरु राज्याचे दोन भाग केले गेले. कौरव हस्तिनापुरात राज्य करू लागले आणि पांडवांना एक वेगळे राज्य दिले गेले जे इंद्रप्रस्थ ह्या नावाने प्रसिद्ध झाले. अशाप्रकारे काही काळ शांततेमध्ये गेला.



काही वर्षांनंतर दुष्ट दुर्योधनाच्या आमंत्रणावरून द्यूत क्रिडेमध्ये कपटी शकुनीने युधिष्ठिराला हरवले, परिणामी पांडवांचे राज्य बळकावले गेले व त्यांना तेरा वर्षांचा वनवास भोगावा लागला, ज्यामध्ये एक वर्षाचा अज्ञातवासही होता. साऱ्या अटी पूर्ण करून, वनवास संपवून परत



आल्यावरही लोभी दुर्योधनाने त्यांना राज्य देण्यास नकार दिला. पांडवांच्या वनवासादरम्यान चतुरंग सेना एकत्र करून तो मदांध झाला होता.

अंतिम प्रयत्न म्हणून योगेश्वर श्रीकृष्ण शांतिदूत बनून महाराज धृतराष्ट्राला भेटले, परंतु मदांध झालेल्या दुर्योधनाने सुईच्या टोकाएवढी भूमीही पांडवांना देण्यास नकार दिला. शेवटी युद्ध झाले. युद्धामध्ये दुर्योधनासहित सारे कौरव मारले गेले व पांडव विजयी झाले. पांडवांनी शरशय्येवर पडलेल्या पितामह भीष्मांचा आशीर्वाद घेऊन धर्म-साम्राज्याची स्थापना केली.

मुलांनो! धृतराष्ट्र आंधळा होता तरीही सारथी संजयद्वारा युद्धाचा संपूर्ण वृतांत ऐकत होता. महर्षि वेदव्यासांद्वारा मिळालेल्या दिव्यदृष्टीमुळे संजय संपूर्ण विवरण ऐकवत होता आणि सांगत होता की हे राजन् ! ह्या युध्दामध्ये पांडवच विजयी होतील, कारण भगवान श्रीकृष्ण त्यांच्याबरोबर आहेत. राजन्! जेथे भगवंत आहेत व अनुरागी भक्त आहे तेथेच ऐश्वर्य, विजय व ईश्वरीय विभूति आहे. भगवान श्रीकृष्णाने महाभारत युध्दात आपला प्रिय सखा - मित्र – शिष्य असलेल्या अर्जुनाचा सारथी बनून त्यास ऐश्वर्य, विजय, विभूति,

साम्राज्य इत्यादि सर्व उपलब्ध करून दिले. हीच थोडक्यात महाभारताची कथा आहे. ह्याच घडलेल्या घटनेच्या माध्यमातून आणि त्यातील पात्रांना प्रतिकात्मक बनवून भगवान श्रीकृष्णांनी गीताज्ञानाची उत्पत्ति केली, उपदेश केला. महाभारतातील ऐतिहासिक युध्द हे ऐहिक आहे, तर 'गीते' तील युध्द अध्यात्मिक आहे. ज्यामध्ये एकाच मनुष्याच्या अंतःकरणात स्थित असलेल्या चांगल्या व वाईट प्रवृत्तींचा संघर्ष आहे, ज्याचे चित्रण 'गीते' मध्ये केले गेलेले आहे.

**प्रिय विद्यार्थ्यांनो,**

आता आपल्याला महाभारताचे महानायक भगवान श्रीकृष्णांबद्दल जाणण्याची उत्सुकता लागली असेल.

## परमात्मा, भगवान, इष्ट, महापुरुष------- योगेश्वर श्रीकृष्ण!

भगवान श्रीकृष्णाला संबोधित ह्या सर्व उपाधि एकच आहेत, विशेषणे आहेत, ज्या साधनेच्या पूर्णतेनंतर ईश्वर- प्राप्तीच्या स्थिति आहेत. श्रीकृष्ण एक पूर्ण योगी होते. त्यांनी बालपणी गुरु महर्षि सांदिपनींच्या आश्रमात राहून सेवा आणि साधनेद्वारा सर्व विद्यांमध्ये पारंगत होऊन योगेश्वराची स्थिति प्राप्त केली व आजीवन मानव कल्याण करीत राहिले. योगेश्वर ती असती जी पूर्ण योगी असती, महापुरुष असती, सद्गुरु असती आणि आपल्या अनुरागी शिष्यामध्येही ही क्षमता आणण्यास समर्थ असती. श्रीकृष्णांच्या अगणित लीला आहेत, त्यामध्ये सर्वात मुख्य आहे - त्यांच्या मुखातून प्रसारित झालेले 'गीताज्ञान'. त्यांनी पूर्ण विश्वातील मानवास अविनाशी योग - 'गीताज्ञान' प्रदान करून, माणसा - माणसांसाठी ईश्वर प्राप्तीच्या साधनेस सुलभ केले आहे.

वस्तुतः योगेश्वर श्रीकृष्णाने मोहग्रस्त अर्जुनास अविनाशी योग - 'गीते'व्दारा, युद्धासाठी प्रवृत्त करून शाश्वत विजय मिळवून दिला. ऐहिक युद्धामध्ये तर विजय-पराजय-विजय असा क्रम चालतच राहतो परंतु गीतेतील युद्धाद्वारे शाश्वत विजय प्राप्त होतो की ज्याच्यानंतर पराजय नसतो.

गीता एक संपूर्ण साधनात्मक ग्रंथ आहे. गुरु-शिष्य संवाद आहे. सद्गुरु आहेत - महापुरुष योगेश्वर श्रीकृष्ण, आणि शिष्य आहे - एक अनुरागी साधक अर्जुन! ---- आपणा सर्वांची अनुरागपूर्ण तळमळच 'अर्जुन' आहे.

मुलानों, लक्षात घ्या! संपूर्ण गीतेतील एकही श्लोक बाहेरील युद्धाचे समर्थन करीत नाही. 'गीते' मध्ये वर्णिलेले युद्धक्षेत्र हे कोणतेही भूक्षेत्र (भूखंड) नाही.

गीता-वक्ता श्रीकृष्णाने स्वतःच सांगितले आहे की- **''इदं शरीरं कौन्तेय क्षेत्रमित्यभिधीयते।''**– कौन्तेय! हे शरीरच एक क्षेत्र आहे (वाचा 'यथार्थ गीता'१३/१). हे युद्ध कोण्या अनुरागी साधकाच्या अंतःकरणात चालणाऱ्या चांगल्या व वाईट प्रवृत्तींमधील संघर्ष आहे. त्यामधे सफलता म्हणजेच विजय होय.

योगेश्वर श्रीकृष्णाने महाभारतातील पात्रांचे उदाहरण देऊन, त्यांना उद्देश्य बनवून गीतेचा उपदेश दिला आहे. हे एकाच अनुरागी साधकाच्या अंतःकरणात चालणाऱ्या युद्धाचे (द्वंद्वाचे) चित्रण आहे, ज्यामध्ये विद्या-अविद्या, प्रकृति-पुरुष, सजातीय-विजातीय प्रवृत्ति, दैवी व आसुरी वृत्तींना ह्या घडलेल्या घटनेच्या पात्रांच्या रुपात संबोधित करून समजावले आहे. अंतःकरणातील विकारांचे आणि परमात्म्याच्या प्राप्तीच्या साधनांचे चित्रण केले आहे.

गीतोक्त युद्धामध्ये विजयी झालेल्या साधकास शाश्वत विजय प्राप्त होतो. असा साधक जन्म-मरणाच्या चक्रातून मुक्त होऊन त्यास परमेश्वराचे परमधाम प्राप्त होते.

मुलांनो! हे आपल्या गुरुजनांकडून व माता-पित्यांकडून समजून घ्या आणि 'यथार्थ गीता' वाचा.

* * *



# 'श्रीमद्भगवद्गीता'





























जवळजवळ ५२०० वर्षांपूर्वी योगेश्वर श्रीकृष्णांनी आपल्या श्रीमुखाने अविनाशी योगाचा (पुरातन ज्ञानाचा) उपदेश, अनुरागी शिष्य अर्जुन ह्यास माध्यम बनवून सर्व मनुष्यमात्रास प्रदान केला. अविनाशी योग- म्हणजे अशी विद्या जी अजर-अमर 'परमात्म्याशी' योग घडवून आणेल, मिलाफ करेल, परमात्म्यास धारण करवून देईल. हीच धर्माची व्याख्या आहे.

ह्या ईश्वरीय वाणीस तत्कालीन महर्षि वेदव्यासांनी सर्वप्रथम संकलित करून त्यास श्रीमद्भगवद्गीता-शास्त्राचे रूप प्रदान केले.

प्रिय विद्यार्थ्यांनो! हे शास्त्र चारही वेद आणि उपनिषदांचे सार आहे. त्यामध्ये सांगितलेल्या आदेशांचे पालन करून आपण आपल्या जीवनात सर्व मिळवू शकता- सर्वोत्तम शिक्षण, चांगला उद्योग-धंदा, सुख-शांति, समृद्धि, नाव-यश आणि परमात्म्याचे परमधाम, मोक्ष सुद्धा. हेच गीतेतील तत्वज्ञान आहे, यथार्थ आहे. ............. आचरणात आणून तर बघा.

विद्यार्थ्यांनो! आज प्रचलित असणारे सर्व धर्म, पंथ तसेच संप्रदाय श्रीकृष्णाच्या काळी नव्हते. हजारो वर्षांनंतर ज्या ज्या महापुरुषांनी 'एक ईश्वर' सत्य असल्याचे सांगितले, ते सर्व गीतेचेच संदेशवाहक आहेत. जगातील सर्व महापुरुष एकच आहेत. वैदिक काळातील महर्षिगण, भगवान श्रीराम, तसेच श्रीकृष्ण, महर्षि मूसा, महात्मा झरतुष्ट्र, भगवान महावीर, गौतम बुद्ध, ख्रिस्त, मुहम्मद साहेब, आदिशंकराचार्य, संत कबीर,

तुलसीदास, गुरुनानक, स्वामी दयानंद सरस्वती, श्रीरामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद आणि स्वामी श्री परमानंदजी इत्यादि सर्व महापुरुषांनी गीतेतील 'एक ईश्वरवादाचा' संदेश आपल्या-आपल्या देशात त्या त्या काळातील भाषांमध्ये समजावला आहे अणि त्या ईश्वरास ब्रह्म, परमात्मा, आत्मा, अहुरमज्दा, गॉड, खुदा इत्यादि पर्यायवाची नावांनी संबोधित केले आहे.

ह्याच सत्याचा प्रतिध्वनी चारही वेद, उपनिषदे, रामायण, अवेस्ता, जैन वाङ्ःमय, बौद्ध वाङ्ःमय 'महापरिनिब्बानसुत', बायबल, कुराण, मानस, कबीरवाणी-साखी, गुरुग्रंथसाहेब इत्यादि धार्मिक ग्रंथांमध्ये आहे, जे गीतेचाच विस्तार आहेत. म्हणूनच भारत विश्वगुरु आहे.

* * *

## — पूज्य स्वामींचा उपदेश —

.....आपल्या संस्कृति प्रमाणे आपण सर्व कार्यांचा प्रारंभ व समापन परमेश्वराच्या स्मरणाने करतो. म्हणून प्रिय मुलांनो! झोपता-उठता, शौचाला जाता, आंघोळ करता, जेवताना, पाणी पिताना, उठता-बसता, शाळेत जाताना, वाचता-लिहीता, खेळताना, जीवनातील प्रत्येक घडामोडीत एका परमेश्वराचे स्मरण राहू दिलेत तर सोन्याहून पिवळे होईल. हां! सकाळ, संध्याकाळ १५ ते २० मिनिटे बसून ॐ चा जप करण्यास वेळ आवश्य द्यावा. सर्व मुले, तरुण, म्हातारे, स्त्री-पुरुष ज्यांना ज्यांना मानव शरीर प्राप्त झाले आहे त्या सर्वांनी ॐ चा जप केला पाहिजे......

—स्वामी श्री अड़गड़ानन्दजी महाराज

## ‘श्रीमद्‌भगवद्‌गीते’ ची यथावत् सुबोध व्याख्या

# ।। यथार्थ गीता ।।

## मानवमात्राचे एकमेव धर्मशास्त्र



**प्रिय मुलांनो!**

कालांतराने ‘गीतेचा’ आशय लुप्त होत चालला होता, पुसट होऊन गेला होता, त्यामुळे गीतेच्या नावावर तमाम धार्मिक तशाच सामाजिक वाईट रीति वाढीस लागल्या होत्या किंवा सामाजिक व्यवस्थेच्या नावावर स्वार्थापोटी त्यांना वाढविण्यात आले होते. समाजामध्ये जात-पात, वर्ण-व्यवस्था, उच्च-नीच, धर्मांतरणाची विकृत व्यवस्था मूळ पकडून बसली होती. अशा संक्रमण काळात प्रकाश-स्तंभाच्या रुपात ‘यथार्थ गीते’चे प्रकाशन झाले आहे. चला! तर ‘यथार्थ गीता’ थोडक्यात जाणून घेऊया.

**५२०० वर्षांच्या मोठ्या कालावधीनंतर स्वामी श्री अड़गड़ानन्दजी महाराजांनी श्रीकृष्णाचा दिव्य संदेश असलेली ‘गीता’ जी संस्कृतमध्ये आहे, तिचे सरळ, सोप्या हिंदी मध्ये ‘यथार्थ गीते’च्या रुपात विवरण केले आहे.** इश्वरीय प्रेरणेने १९८३ साली प्रकाशित झालेली ही ‘यथार्थ गीता’ आजच्या मानवमात्राचे दिशा निर्देशन करीत आहे.

भगवान श्रीकृष्णाचा आशय यथा-अर्थ (जसाच्या तसा) व्यक्त केल्यामुळे ह्याचे नाव ‘यथार्थ गीता’ आहे. महाराजांनी ‘यथार्थ गीता’ प्रस्तुत करून सत्याच्या नावावर पसरलेल्या आणि सत्यासारख्या प्रतीत होणाऱ्या तमाम वाईट रितींचे निवारण करून आपणा सर्वांना कल्याणाचा मार्ग दाखविला आहे.

कालजयी कृति- ‘यथार्थ गीता’ भारतातील सर्व प्रमुख भाषांमध्ये मराठी, पंजाबी, गुजराथी, उर्दू, संस्कृत, उडिया, बंगाली, तामिळ, तेलगू, मल्याळम्, कन्नड तसेच आसामी आणि आंतरराष्ट्रीय भाषा- इंग्रजी, जर्मन, फ्रेंच, नेपाळी, स्पॅनीश, नॉर्वेजीयन, चायनीज, फारसी, डच, इटालियन व रशियन ह्या भाषांमध्ये अनुवादित झालेली आहे.

'यथार्थ गीते'चा उत्कर्ष विसाव्या शतकातील महान रचना, घटना तसेच प्राप्ति यासाठी आहे. ती वेळ आता दूर नाही की जेव्हा 'यथार्थ गीतारुपी' अक्षय वटवृक्षाच्या सावलीत संपूर्ण विश्वातील मानवता विसावा घेईल.

'गीतेस' यथावत् समजून घेण्यासाठी, चांगल्या प्रकारे जाणण्यासाठी 'यथार्थ गीता' तीन-चार वेळा अवश्य वाचा.

ॐ शान्तिः! शान्तिः!! शान्तिः!!!





# 'यथार्थ गीता' चे रचनाकार

## सद्गुरु स्वामी श्री अड़गड़ानन्द जी महाराज

यथार्थ गीतेचे रचनाकार एक परमात्मस्थित महापुरुष आहेत. त्यांच्याजवळ कोणत्याही शैक्षणिक पदव्या नाहीत, परंतु सद्गुरुंच्या कृपेने पूर्णत्व प्राप्त करून मानवमात्राचे कल्याण करण्यामध्ये ते निमग्न आहेत– **'सर्वभूतहिते रतः'।** लेखनाला आपण साधनेमधील अडथळा मानायचात परंतु गीता भाष्य 'यथार्थ गीता' लिहिण्यामागे परमेश्वराचा आदेशच निमित्त बनला.

परमेश्वराने आपल्याला अनुभवामध्ये सांगितले की तुमच्या साऱ्या वृत्ति शांत झालेल्या आहेत, केवळ एक लहानशी वृत्ति शेष आहे, ती म्हणजे गीताज्ञानाचे यथावत् पुनर्प्रकाशन! प्रथम तर आपण ह्या वृत्तीस साधनेने नष्ट करण्याचा प्रयत्न केलात परंतु... भगवंताच्या आदेशाने 'यथार्थ गीता' मूर्तस्वरूप झाली.

'यथार्थ गीते' च्या रचनेच्या काळात, टिकेमध्ये जेथे त्रुटी होत होत्या, भगवंत त्या सुधारत होते! पूज्य स्वामींची 'स्वान्तः सुखाय' अशी कालावर विजय मिळवलेली ही रचना 'सर्वान्तः सुखाय' बनली आहे, आर्यावर्त भारतातीलच नव्हे तर विश्वातील मानवमात्राच्या कल्याणामध्ये अनुरक्त आहे.

यथार्थ गीतेच्या प्रकाशात आपणही प्रकाशमान व्हा.

* * *

# गीतेतील प्रमुख सिद्धांत

**प्रिय विद्यार्थ्यांनो,**

सृष्टीच्या आरंभापासून प्रसारित झालेल्या अविनाशी योग-गीतेपासून विश्वातील सर्व मानव पिढयांनी आपले हित साधले आहे. सर्वांसाठी ती एक दीपस्तंभ बनून राहिला आहे. चला! आपणही त्यामध्ये प्रकाशमान होऊ या.

## गीतेचे मुख्य सिद्धांत

- एक परमात्माच सत्य आहे, शाश्वत आहे (म्हणजेच अजर, अमर, अविनाशी आहे) आणि सनातन आहे (म्हणजेच सतत होता आणि राहील). – (गीता, २/२४)

  मुलांनो! ह्याच एका परमात्म्यास आत्मा, ईश्वर, ब्रह्म, गॉड अथवा खुदाही म्हणतात. सर्व त्या एका ईश्वरास संबोधित करणारी नावे आहेत..... देश-काळ-भाषेनुसार नामकरण झाले आहे.

- आपण सर्व त्याच एका परमात्म्याची मुले आहोत, त्याचाच अंश आहोत – (गीता, १५/७)

  तेव्हां सर्व मुलांनी जात-पात, उच्च-नीच, लहान-मोठा, श्रीमंत-गरीब आणि धार्मिक मतांमधील भेदभाव नष्ट केला पाहिजे आणि आपसात समानतेने व्यवहार केला पाहिजे.

- ती परमात्मा वा ईश्वर सर्व प्राण्यांच्या हृदयात निवास करतो.

  – (गीता, १८/६१, १५/१५)

  तेव्हा मुलांनो, हृदयात स्थित असलेल्या त्या एका ईश्वरालाच शरण गेले पाहिजे आणि संपूर्ण भावनेने त्याचे भजन-पूजन केले पाहिजे, असे होता कामा नये की इतर देवी - देवतांमध्ये आपला श्रद्धाभाव विभागून टाकला! संपूर्ण समर्पणासह एका ईश्वराला पूजणारा सर्व काही प्राप्त करू शकतो... ईश्वरालाही. –(गीता, १८/६२)

  आणखी एक गोष्ट! आपण जो काही विचार करता, तो विचार ईश्वर आधीच जाणत असतो कारण तो आपल्या हृदयातच विराजमान असतो. तेव्हा नेहमी शुभ विचार करावा.

- ईश्वराला अनन्य (अन्य न म्हणजेच एका ईश्वराशिवाय कोणत्या दुसऱ्या देवी, देवता नाही) भक्ति द्वारे पाहू शकता येते, जाणू शकता येते आणि त्यास प्राप्तही करू शकता येते. – (गीता, ११/५४)

- जे अन्य देवी-देवतांना पूजतात ते अविवेकी असतात. त्यांचे पूजन विधिपूर्वक नसते म्हणून नष्ट होऊन जाते. – (गीता, ७/२०, ९/२३, ७/२३)

- तेव्हा मुलांनो! पूजेचा निर्धारित विधि आहे- ॐ चा जप, एका परमात्म्याचे स्मरण आणि कोणा संत, महापुरुषाला शरण जाऊन त्यांची सेवा. बस! इतकाच पूजा-ध्यानाचा निर्धारित विधि आहे. –(गीता, ८/१३)
- एका परमात्म्याच्या भजनाने आपल्या सर्व कामना पूर्ण होतील. –(गीता, ९/२०)
- प्रिय मुलांनो! मोठ्या भाग्याने हे मानवी शरीर मिळते जे देवतांनाही दुर्लभ असते. ह्या मानवी शरीराची सार्थकता आहे-एका ईश्वराच्या भजनाद्वारा सर्व काही मिळविणे ... 'ईश्वराला' ही. –(गीता, ९/३३)
- विश्वातील सर्व मनुष्यांचे आणि आपणा सर्वांचे धर्मशास्त्र गीता आहे. –(गीता, १५/२०)

सृष्टीच्या आरंभापासून प्रसारित झालेल्या ह्या दिव्य ज्ञानाला महर्षि वेदव्यासांनी जवळजवळ ५२०० वर्षांपूर्वी संकलित करुन निर्णय दिला की - गीता धर्मशास्त्र आहे.

**'गीता सुगीता कर्तव्या किमन्यैः शास्त्रविस्तरैः।'**

अर्थात्, ईश्वरीय गायन 'गीता'शास्त्र असताना अन्य शास्त्रांच्या विस्तारात जाण्याची काय गरज आहे? अतः मानवमात्राचे आदि धर्मशास्त्र असलेल्या गीतेचे अनुकरण करावे.

- धर्म - एक ईश्वर, महापुरुष, सद्‌गुरु, योगेश्वरांच्या प्रति पूर्ण समर्पणच धर्म आहे. –(गीता, १८/६६)
- धर्माचरण - त्या ईश्वरास प्राप्त करण्यासाठी, गीतेतील निर्धारित विधीचे आचरणच धर्माचरण आहे. –(गीता, २/४०)
- धर्माची प्राप्ति - पूर्णयोगी, योगेश्वर, परमात्मस्थित सद्‌गुरुंना शरण, त्यांची सेवा आणि त्यांच्या कृपेद्वारेच धर्माची प्राप्ति संभवत असते. –(गीता, ४/३४, १४/२७)

**विस्तृत माहितीसाठी 'यथार्थ गीता' तीन-चार वेळा वाचावी.**

* * *



# ॐ
# ।। वैचारिक मुद्दे ।।

प्रिय मुलांनो! गीता एक संपूर्ण साधनात्मक ग्रंथ आहे. पूर्ण गीता हा गुरु-शिष्य संवाद आहे. ह्यामध्ये अनुरागी अर्जुनाच्या सर्व प्रश्नांची उत्तरे योगेश्वर अर्थात सद्गुरु श्रीकृष्णांनी दिली आहेत. हे सर्व प्रश्न आपलेही आहेत. सर्व अनुरागींचे आहेत आणि असायलाही हवेत! तेव्हाच आपण परमसत्य परमात्म्याला शोधायला प्रेरित व्हाल. हेच 'गीता' सांगते. 'गीते'ला सहज रुपात समजण्यासाठी 'यथार्थ गीता' अवश्य वाचावी.

- गीताज्ञानाच्या प्रसारणाच्या वेळी विश्वामध्ये कोणताही धर्म वा संप्रदाय नव्हता. वर्तमानातील प्रचलित सर्व धर्म-संप्रदाय गीतेच्या हजारो वर्षांनंतर प्रचलनात आलेले आहेत. तेव्हां 'गीता'धर्म, संप्रदाय व भेदभावापासून मुक्त असलेला ज्ञानग्रंथ आहे.
- वस्तुतः विश्वातील सर्व महापुरुषांनी गीतेमधील ज्ञानच आपल्या-आपल्या देश-काळातील भाषेमध्ये समजावले आहे. अर्थात ज्याप्रमाणे पाणी म्हणा वा वॉटर, जल म्हणा वा आप, त्याचप्रमाणे ईश्वर म्हणा वा गॉड, परमात्मा म्हणा वा खुदा काही फरक नाही पडत. जे फरक करतात, ते एक तर जाणत तरी नाहीत किंवा आपल्या स्वार्थासाठी जाणून घेऊ इच्छित नाहीत. त्यांना समजवा आणि त्यांना ही पुस्तिका व 'यथार्थ गीता' वाचावयास द्या.
- गीता एक सार्वकालिक (सर्व काळाशी संबंधित) सार्वलौकिक (सर्व जगामध्ये व्याप्त) आणि सार्वजनिक (सर्वांसाठी उपयुक्त) मानवशास्त्र आहे. परमात्म्यास धारण करविते म्हणून धर्मशास्त्र आहे.
- प्रिय मुलांनो! गीतेचे अनुसरण करण्यासाठी आपल्याला ना कोणत्या मताला, संप्रदायाला वा धर्माला सोडायचे आहे, ना कोणाची दिक्षा घ्यायची आहे. ती बाहेरच्या ह्या अवडंबरांपासून तसेच कर्मकांडांपासून मुक्त आहे.



- गीता कोणा विशेष व्यक्ति, वर्ग, संप्रदाय, देश-काळाचा ग्रंथ नाही. ती प्रत्येक देश, संप्रदाय आणि सर्व स्त्री-पुरुष तसेच मुलांसाठी आहे.
- 'यथार्थ गीता' हा साधन ग्रंथ पूर्ण विश्वातील प्रत्येक घरात आणि प्रत्येक व्यक्ति जवळ असला पाहिजे. आपल्या दप्तरात शाळेत, विद्यालयात आणि वाचनालयात असला पाहिजे.
- 'यथार्थ गीते'च्या अनुसरणाने आपण आपल्या देशालाच नाही तर विश्वाला समस्यारहित कराल. विश्वशांति आणि 'वसुधैवकुटुम्बकम्' ला साकार कराल.

आपले कल्याण होवो! आपण सफल व्हा! यशस्वी व्हा!!

* * *

**केवळ एका ईश्वराच्या आराधनेने सर्व कामनांची पूर्ति होते.**

गीतेमध्ये भगवान श्रीकृष्ण म्हणतात--

चतुर्विधा भजन्ते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन।
आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ।। (गीता ७/१६)

हे भरतश्रेष्ठ अर्जुना! मला चार प्रकारचे भक्तजन भजतात-**आर्त**-जे दुःखी आहेत, **अर्थार्थी**-जे संसारिक द्रव्य व कामनांच्या पूर्तीची इच्छा करतात, **जिज्ञासू**- जे मला यथार्थ रुपाने समग्रपणे जाणण्याची इच्छा करतात आणि **ज्ञानी**-जे साधनेच्या परिपक्व काळामध्ये माझे प्रत्यक्ष दर्शन घेऊन माझ्यामध्ये स्थित झालेले आहेत. अशाप्रकारे चार प्रकारचे भक्तजन मला भजतात! मी त्यांना सर्वकाही देतो.

**(गीता ७/१६)**

# विद्यार्थ्यांचे कर्तव्य

खालील नियमांचे पालन करून तुम्ही तुमच्या जीवनातील सर्व ध्येयांना प्राप्त करू शकाल. त्या नियमांचे पालन करून तर बघा!

## - नियत दिनचर्या -

- दररोज ब्रह्ममुहूर्तावर पहाटे चार वाजता अवश्य उठले पाहिजे.
  उठून कोणा 'एका' इष्ट, परमात्मा वा सद्गुरुचे (सर्व एकच आहेत, पर्यायवाची संबोधने आहेत) श्रद्धापूर्वक ध्यान केले पाहिजे. (१० मिनिटे).
- ध्यान हृदयामध्येच केले जाते कारण तेथेच परमात्मा निवास करतो.
- ध्यानानंतर १५ मिनिटे तोंडाने उच्चार करून ओम् चा जप करावा. श्वास आत घेतला की ओम्, बाहेर पडला (उच्छवास) की ओम्. अशाप्रकारे श्वास-प्रश्वासाच्या स्वाभाविक गतीबरोबर ओम् चा लयपूर्वक धारावाही जप करावा. जप करताना श्वास-प्रश्वासाबरोबर ओम् च्या चढाव-उतारावर लक्ष्य ठेवावे.
- रोज सकाळी मोठ्यांना, आई-वडिल तसेच गुरुजनांना सादर प्रणाम करावा. घरातील मोठ्यांची-म्हाताऱ्या माणसांची सेवा केली पाहिजे आणि सर्वांच्या आज्ञेचे पालन केले पाहिजे. त्याने तुमचे आयुष्य, विद्या, यश आणि शक्ति ह्यांमध्ये वृद्धि होईल.
- रोज सकाळी अथवा संध्याकाळी यथार्थ गीतेतील चार श्लोकांचे अर्थासहित, लक्षपूर्वक वाचन करावे.
- नियमित शाळेला जावे. अभ्यासाकडे पूर्ण लक्ष्य द्यावे आणि शाळेत दिलेला गृहपाठ रोजच्या रोज पूर्ण करावा.
- उत्तम स्वास्थ्य आणि शरीरसौष्ठवासाठी शारीरिक परिश्रम, खेळ वा व्यायाम रोज करावा.
- रात्री नऊ वाजता अवश्य झोपावे की ज्यामुळे पहाटे चार वाजता ब्रह्ममुहूर्तावर उठणे शक्य होईल. झोपण्या-उठण्याच्या वेळेचे नियमित पालन करावे. त्याने आपले सारे काम व्यवस्थित होईल.
- **आवश्यक–** रात्री झोपण्याच्या आधी परमेश्वराचे ध्यान करावे आणि वर सांगितलेल्या पद्धतीने १० मिनिटे ओम् चा जप करीत-करीत झोपून जावे.

# - दर आठवडयाला -

- गीतेतील एक श्लोक पाठ करावा.
- एक 'यथार्थ गीता' अभ्यास वही बनवून त्यात दर आठवड्याला तीन श्लोक लिहावेत.
- हे साप्ताहिक कार्य आपल्या आई-वडिलांना तसेच शाळेतील गुरुजनांना दाखवावे व पाठ केलेले श्लोक त्यांना म्हणून दाखवावेत.
- शाळेत, घरी अथवा शेजारी-पाजारी- आपल्या मित्रांबरोबर एका तासाच्या 'यथार्थ गीता' ज्ञान सभेचे दर आठवड्याला आयोजन करावे. ह्या सभेमध्ये यथार्थ गीतेचे सामुदायिक वाचन करावे आणि त्यावर आपसात चर्चा करून आपले ज्ञान भांडार वाढवावे. ह्या कार्यक्रमात आपल्या गुरुजनांना आणि आपल्या पालकांना आमंत्रित करून त्यांच्याकडून मार्गदर्शन व त्यांचे आशीर्वाद प्राप्त करावेत.

* * *



!! ॐ श्री सद्गुरुदेवाय नमः !!

# गुरु-महिमा

राम कृष्ण से को बड़ा, तिन्हहु तो गुरु कीन।
तीन लोक के ये धनी, गुरु आज्ञा आधीन।।

भगवान श्रीराम, श्रीकृष्ण ह्यांपेक्षा महान असा कोणी पूजनीय आहे? तेही मानवी शरीरधारी होते. बालपणी त्यांनीही गुरु विश्वामित्र, वसिष्ठ आणि सांदीपनी मुनींना शरण जाऊन सर्व लौकिक आणि पारलौकिक विद्या ग्रहण करून मानवापासून महामानवापर्यंत, पुरुषापासून महापुरुषापर्यंतची स्थिती प्राप्त केली होती. तेव्हा मुलांनो! सद्गुरुंना शरण, त्यांची सेवा आणि त्यांच्या आज्ञेचे पालन करावे. हीच सर्व विद्यांची जननी आहे. जी आपल्याला सामर्थ्यवान, विद्यावान आणि महान बनविते.

धन्य माता पिता धन्यो, गोत्रं धन्यं कुलोद्भवः।
धन्या च वसुधा देवि यत्र स्याद्गुरुभक्तता।।

ज्याच्यामध्ये गुरुभक्ति असते त्याची माता धन्य आहे.त्याचे पिता धन्य आहेत,त्याचा वंश धन्य आहे, त्याच्या वंशामध्ये जन्म घेणारे धन्य आहेत, समग्र धरणी माता धन्य आहे.

* * *

## विश्वाची महान संस्कृति असलेली भारतातील गुरु-शिष्य परंपरा



गुरु वसिष्ठजींच्या
श्री चरणांपाशी
भगवान् श्रीरामजी

गुरु सांदीपनीजींच्या
श्री चरणांपाशी
भगवान् श्रीकृष्णजी





गुरु श्री परमानन्दजींच्या
श्री चरणांपाशी सद्गुरु
श्री अड़गड़ानन्द जी

॥ ॐ श्री परमात्मने नमः ॥

# गौरवशाली ऐतिहासिक ग्रंथ 'महाभारत'


**प्रिय विद्यार्थ्यांनो!**

महर्षि वेदव्यास द्वारा लिखित ऐतिहासिक ग्रंथ 'महाभारत' हा आर्यावर्त भारताचा प्रामाणिक इतिहास आहे. ह्यामध्ये सृष्टीच्या आरंभापासून ते द्वापर पर्यंतच्या (आजपासून ५२०० वर्षांपूर्वी श्रीकृष्णाच्या काळापर्यंतच्या) भारतीय शिष्टाचार व संस्कृतीचे विवरण केलेले आहे. मानवी जीवनाचा असा कोणताही पैलू नाही की जो ह्यामध्ये स्पर्शिलेला नाही. असे काहीहि नाही की जे महाभारतात समाविष्ट केले गेलेले नाही लोकनीति, राजनीति, युद्धनीति, व्यवहारनीति, जीवन-दर्शन, अध्यात्म आणि धर्म.



भारतातील ऋषि-मुनींचा सत्याचा शोध (सत्य 'एकमात्र परमात्मा' त्याचा शोध) साधना आणि ईश्वर प्राप्तीचे संपूर्ण विवरण महाभारतामध्ये उपलब्ध आहे. महाभारतात वर्णिलेली सर्व कथानके व घटना सत्य आहेत, आमच्या पूर्वजांची ती कीर्ति आहे. आपण सर्व त्याच पूर्वजांचे वंशज आहोत.

महर्षि वेदव्यास द्वारा संकलित केलेल्या एक लाख श्लोकांच्या महाभारताचा सहावा अध्याय 'भीष्मपर्व' ह्यामध्ये असलेली ७०० श्लोकांची 'श्रीमद्‌भगवद्‌गीता' आपले 'धर्मशास्त्र' आहे. ज्यामध्ये 'सत्य' काय आहे आणि त्यास कसे प्राप्त करायचे ते सांगितले गेले आहे. असे हे महान ज्ञान असलेल्या 'गीते'ची संक्षिप्त माहिती ह्या पुस्तिकेच्या प्रारंभी दिलेली आहे. पूर्ण माहिती गीताभाष्य 'यथार्थ गीते' मध्ये उपलब्ध आहे.



'इतिहास' हा मानवी पिढयांच्या सुख-दुःखांच्या घटनांचे संकलन असते तर 'धर्म' अनन्त जीवन, शाश्वत शांति तसेच परमात्म्याचे परमधाम प्राप्त करून देतो आणि पुढील पिढयांचा मार्गदर्शक असतो. जेथे धर्म आहे तेथेच विजय असतो. **'यतो धर्मस्ततो जयः।'**

'गीता' हे मानवमात्राचे योगदर्शन शास्त्र आहे, परमपिता परमात्म्याशी योग म्हणजेच मिलन घडवून आणणारी विद्या आहे. भगवान् श्रीकृष्ण जाणत होते की सांसारिक युद्धामध्ये जिंकणाऱ्यालाही शाश्वत विजय मिळत नाही, भले तो चक्रवर्ती सम्राट असला तरीही. म्हणून त्यांनी आपला सखा-मित्र-शिष्य 'अर्जुना'ला माध्यम बनवून गीतेच्या उपदेशाद्वारा शाश्वत विजयाचे ज्ञान मानवमात्रास प्रदान केले.

महाभारतातील प्रसिद्ध ऐतिहासिक युद्ध कुरुक्षेत्राच्या मैदानावर झाले. कोट्यावधि लोक वीरगतीस प्राप्त झाले. विजयी झालेल्या सम्राट युधिष्ठिराला शांति प्राप्त झाली नाही, शेवटी त्याने राज्य व सर्वस्वाचा त्याग करून हिमालयाची वाट पकडली. युद्धाच्या आरंभी प्राप्त झालेला 'गीते'चा उपदेश त्याच्या डोक्यामध्ये घर करून होता, तो भजन (साधना) करण्यासाठी निघाला.


दुर्योधनाचा एक भाऊ 'युयुत्सु' युद्ध आरंभ होण्यापूर्वीच पांडवांच्या पक्षात आला होता. महाराज युधिष्ठिराला वनामध्ये जाताना बघून तो म्हणाला, "दादा! कोठे निघालात? चक्रवर्ति सम्राटाच्या ह्या रत्नजडित सिंहासनावर कोण बसणार!" महाराज युधिष्ठिर म्हणाला, "युयुत्सु! ह्यावर तू बस आणि बघ त्यामध्ये किती सुख आहे ते! शेवटी स्वजनांचा संहार ह्यासाठीच तर झाला होता." युयुत्सु म्हणाला, "दादा! मला हे कदापि नको आहे." तेव्हा महाराज युधिष्ठिर म्हणाले, "पुत्र परीक्षित कोठे खेळत असेल तर त्याला सांग. तो बसला तर ठीक अन्यथा ह्या गोष्टीची चिंता सोड. भले! नश्वरासाठी कशाला अश्रू वहायचे?" असे म्हणून त्या सर्वांनी गीतेत सांगितलेला साधनेचा मार्ग आत्मसात केला.

अशाप्रकारे 'महाभारत' हे आर्यावर्त भारताच्या इतिहासाबरोबरच त्याच्या संस्कृतीचेही शास्त्र आहे आणि त्याच्याच एका अध्यायात असलेले 'श्रीमद्भगवद्गीता' हे आपले 'धर्मशास्त्र' आहे.

* * *

# ‘महाभारत’ व ‘गीते’ तील बोध देणारे प्रेरक प्रसंग

विद्यार्थ्यांच्या ज्ञानामध्ये भर पडावी म्हणून प्रस्तुत आहेत महाभारत व गीतेमधील बोध देणारे काही प्रेरक प्रसंग. हे सर्व प्रसंग, कथानके व दृष्टांत-पूज्य गुरुदेव श्री अडगडानन्द महाराजांच्या प्रवचनांमधून संकलित केलेले आहेत, त्यांच्या श्रीमुखातील वाणी आहे.त्यांच्या मनोरंजक, उपदेशात्मक शब्दांच्या वाणीने हे सर्व प्रसंग जणू जिवंत होतात आणि मनःचक्षु पुढे चलचित्राप्रमाणे तरळू लागतात. ते प्रसंग शब्दशः प्रस्तुत करण्याचा प्रयत्न केला आहे. आम्हाला आशा वाटते की हे बोधपर प्रसंग सर्व विद्यार्थ्यांना अभ्यासात व साधनेत सहाय्यक ठरतील. त्यांचे अनुकरण करून विद्यार्थी त्यांच्या जीवनामध्ये सुख-शांति, स्वास्थ्य, समृद्धि इत्यादि सर्वकाही प्राप्त करतील.



## प्रेरक प्रसंग – ९

### सफलतेचा नियम

### आपले ध्येय निश्चित असावे व त्यासाठी सतत प्रयत्नशील रहावे.

एकाग्र होऊन, दृष्टि स्थिर ठेऊन एकमात्र ध्येयावर लक्ष्य केंद्रित करणाराच सफल होतो. एकदा शस्त्रविद्येचे गुरु द्रोणाचार्य ह्यांनी एक पक्षी यंत्र (कृत्रिम पक्षी) बनविले आणि त्यास एका झाडावर टांगले. मग त्यांनी सर्व शिष्यांना त्या पक्ष्याच्या डोळ्यावर नेम धरायला सांगितला. गुरु द्रोणाचार्यांनी सर्व शिष्यांना क्रमशः बोलविले, काही प्रश्न विचारले व परत पाठवून दिले. युधिष्ठिराला त्यांनी विचारले 'तुला काय दिसत आहे?' युधिष्ठिराने सांगितले, "एक विशाल वृक्ष,त्याच्या फांद्या, त्यावर बसलेला पक्षी आणि वर अनंत आकाश!" गुरु द्रोणांनी त्यालाही बाण बाजूला ठेवायला सांगितला. दुर्योधनालाही हाच प्रश्न विचारला की "काय दिसत आहे?" तो रागाने म्हणाला, "सर्व गुरुबंधु दिसत आहेत, आपणही दिसत आहात, पक्षी दिसत आहे, आदेश द्यावा" गुरु द्रोणांचार्यांनी त्यालाही बाण बाजूला ठेवायला सांगितला.

शेवटी अर्जुनाची पाळी आली. त्यालाहि गुरुदेवांनी विचारले, "काय दिसत आहे?" उत्तर होते, "गुरुदेव! केवळ पक्षाचा डोळा." आदेश मिळाला 'सोड बाण' व बाण वेगाने पक्षाचा डोळा वेधून पुढे गेला. प्रसन्न होऊन आचार्यांनी अर्जुनाला जवळ घेतले. पुढे हाच विद्यार्थी 'अर्जुन' विश्वातील अव्दितीय धनुर्धर झाला.

सारांश - विद्यार्थ्यांचे ध्येय निश्चित असले पहिजे आणि ते प्राप्त करण्यासाठी सतत प्रयत्नशील असले पाहिजे, तरच सफलता प्राप्त होते.

* * *



## प्रेरक प्रसंग – २

### शिक्षणामध्ये प्रेरणा व चिकाटीचे महत्व

प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये प्रतिभा असते. शिक्षक त्या प्रसुप्त प्रतिभेला जागृत करतात. शिक्षकांनी प्रेरणा आणि प्रोत्साहन देऊन झाल्यावर आपल्या कुवतीनुसार विद्यार्थी ते ग्रहण करतात. गुरु द्रोणाचार्यांनीही सर्व शिष्यांना सारखेच शिक्षण दिले होते, परंतु निष्णात झाला अर्जुन!


**गोष्ट अशी आहे**– एकदा रात्री भीम व अर्जुन जेवायला बसले होते व अकस्मात दिवे विझले, अंधार झाला. ते घाबरले! आता मी जेवण कसे करू? परंतु हात आपोआपच तोंडापाशी गेला व घास तोंडात गेला. अर्जुन म्हणाला, ‘‘दादा! दिसत नाही तरीही माझा हात नेमका तोंडापाशी जात आहे. असे कसे?’’ भीम म्हणाला, ‘‘अभ्यास, अर्जुना! अभ्यास!! ह्याचा अभ्यास झाला आहे, म्हणून जेवण अनुवठी अथवा नाकाला स्पर्श न करता सरळ तोंडामध्ये जात आहे.’’

बस! अर्जुनाला ह्यावरून प्रेरणा मिळाली. तो दिवसा उजेडी वटवृक्षावर निशाण बनवून ठेवायचा आणि मध्यरात्री काळ्याकुट्ट अंधारात त्यावर बाण मारण्याचा सराव करायचा. एके दिवशी धनुष्याची टंकार गुरु द्रोणांच्या कानावर पडली. त्यांनी पाहिले की अर्जुन मध्यरात्री अंधारातही आपले लक्ष्य अचूक वेधत आहे. गुरु द्रोण अवाक् झाले! ‘अर्जुन ही विद्या तर मी शिकविली नाही.’ अर्जुन म्हणाला ‘‘गुरुदेव! शिक्षण तर आपणच दिलेत. हां, परंतु प्रेरणा भीम दादाकडून जेवताना झालेल्या संवादामुळे मिळाली.’’

वाक्प्रचार आहे - ‘बाळाचे पाय पाळण्यात दिसतात’ म्हणजे भविष्यात उन्नति करणाऱ्याचे लक्षण लहानपणापासूनच दिसू लागते. अर्जुन असाच विद्यार्थी होता. म्हणूनच तो विश्वातील महान धनुर्धर झाला आणि महाभारतातील युध्दात त्याने विजयश्री प्राप्त केली.

सारांश - सर्व विद्यार्थ्यांनी आपले शिक्षण व ध्येय पूर्तीसाठी मनापासून प्रयत्नशील असले पाहिजे. शिक्षण व ध्येयप्राप्तीमध्ये महत्वाचा घटक म्हणजे प्रेरणा व दाखल्यांच्या बाबत जागरुक असणे, असाच विद्यार्थी सफल होतो. विश्वातील सर्व विद्वानांचाही हाच सिध्दांत होता.

* * *



## प्रेरक प्रसंग – ३

### गृहपाठ (होम वर्क) मनापासून व समजून घेऊन पूर्ण करावा.

विद्यार्थ्यांना गृहपाठ देण्याची परंपरा प्राचीन काळापासूनच आहे. एकदा आचार्यांनी कौरव-पांडव व सर्व विद्यार्थ्यांना एक पाठ शिकविला–

१. अपकार करणाऱ्यावरही जो उपकार करतो तो महान असतो.

२. जी गोष्ट सांगायला भीति वाटते तरीही खरे काय आहे ते जो सांगतो तो महान असतो.

गुरुजींनी आज्ञा दिली 'ही वचने उद्या पाठ करून या'

दुसऱ्या दिवशी गुरुजींनी विचारले तेव्हा सर्वांनी ती वचने म्हणून दाखवली, परंतु युधिष्ठिर म्हणाला "गुरुदेव! माझी पाठ झाली नाहीत." जवळजवळ सात दिवस हेच चालू होते. मग मात्र गुरुजींना जरा राग आला. त्यांनी युधिष्ठिराला एक छडी मारली.

युधिष्ठिर काही वेळ गप्प बसला, नंतर म्हणाला "गुरुदेव! वचने पाठ झाली."

**प्रथम– अपकार करणाऱ्यावरही उपकार करणारा महान असतो.** गुरुकुलाला सूचना आहेत, 'राजकुमारांना छडी मारू नये अन्यथा ते घाबरट व भित्रे होतील. जर कोणी छडी मारली तर त्यास मृत्युदंड दिला जाईल.' आपण मला छडी मारलीत तरीही मी आपल्याला क्षमा केली.

**दुसरा– जी गोष्ट सांगायला भीति वाटते तरीही खरे काय, ते जो सांगतो, तो महान असतो.** मला भीति वाटते की जर मी खरे सांगितले तर आपण माझे शिक्षण कमी कराल. माझ्यावरचे आपले लक्ष कमी होईल तरीहि मी खरे सांगितले.

गुरुजींनी युधिष्ठिराला जवळ घेऊन म्हटले "बेटा! तू खरा विद्यार्थी आहेस. एक दिवस अवश्य महान होशील."

सारांश - कोणताही धडा केवळ पाठ करणे पुरेसे नसते. चांगला अभ्यास तो असतो जो मनापासून केला जातो, हृदयात घर करून रहातो, आचरणात आणला जातो.

* * *



## प्रेरक प्रसंग – ४

### काल्पनिक भूत - प्रेतांचे अस्तित्व नसते, तर भीति कसली?

'भूत' एक पवित्र व यौगिक शब्द आहे. वेद, उपनिषद व गीतेतील शब्द आहे. भूत म्हणजे जीवित प्राणी आणि प्रेत म्हणजे मृत प्राणी.

महाभारत युध्दाच्या प्रारंभी उभ्या असलेल्या मोहग्रस्त अर्जुनाला 'गीते'चा उपदेश करत भगवान श्रीकृष्ण म्हणतात.

- **ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः।** **(गीता, १५/७)**

अर्जुना! ह्या देहामध्ये, शरीरामध्ये (स्थित) असलेला हा जीवात्मा (जीवभूत) माझाच सनातन अंश आहे. म्हणजेच आपण सर्व त्या परमपिता परमेश्वराचे अंश आहोत, त्याचीच संतती आहोत; आणि तितकेच पवित्र आहोत जितके पवित्र परमेश्वर आहेत.

- **ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति।** **(गीता, १८/६१)**

अर्जुना! तो ईश्वर सर्व भूत-प्राण्यांच्या हृदय देशात निवास करतो. अर्थात, तो ईश्वर सर्वशक्तिमान आहे, कणा-कणामध्ये व्यापलेला आहे, ज्योतिर्मय आहे आणि सर्व मनुष्यांच्या (भूत-प्राण्यांच्या) हृदयामध्ये निवास करतो.

- **भगवंताला 'भूतनाथ' ही म्हणतात.** म्हणजेच – भगवंत! सर्व प्राण्यांचे (भूतांचे) नाथ आहेत, स्वामी आहेत, प्रभु आहेत!

प्रिय विद्यार्थ्यांनो! पाहिलेत! 'भूत' हा शब्द किती पवित्र आहे ते! कालांतराने 'भूत' ह्या पवित्र शब्दाला प्रेत ह्या शब्दाशी जोडले गेले. प्रेत म्हणजे जे मरण पावले आहेत त्यांचे शरीर, त्यांच्याशी भूत हा शब्दा जोडला गेल्यामुळे त्यास भयाचे स्वरूप प्राप्त झाले. त्याचा मूळ आशयच हरवला गेला. 'भूत-प्रेत- पिशाच्च 'इत्यादि काल्पनिक नावे देऊन आणि भय उत्पन्न करून, लोकांकडून आपल्या खाण्या- पिण्याची व्यवस्था ह्या भोंदू लोकांनी करून घेतली. दृढ निश्चयी विद्यार्थ्यांनो! जनमानस व्यापून असलेल्या ह्या वाईट रितींना तसेच अंधविश्वासाला कदापि मानू नका, आपल्या बरोबरच्या मित्रांनाही जागरुक करा.

जर भूत-प्रेतांचे अस्तित्वच नसते, तर त्यांची भीति कशाला? पालकांकडून ही अपेक्षा आहे की ह्या काल्पनिक गोष्टीवर विश्वास ठेऊ नका, मुलांना भूत-प्रेत ह्या शब्दांनी घाबरवू नका आणि घाबरु देऊ नका. कारण ही भीति त्यांचा जन्मभर पिच्छा पुरवेल आणि त्यांच्या प्रगतीमध्ये बाधक ठरेल. मुलांना निर्भय बनवा, भयभीत तर कदापि करू नका!

कदाचित तसेच काही कारण असेल वा अन्य कोणते भय असेल तर त्यासाठी 'यथार्थ गीते' चे तीन-चार वेळा वाचन करावे.

सारांश - एका परमात्म्यामध्ये श्रद्धा स्थिर करून त्याचे स्मरण करावे आणि ॐ चा जप करावा. आपल्या गुरुजनांचा आदर करावा. आपण कायमचे निर्भय व्हाल.

* * *

## प्रेरक प्रसंग – ५


### एका परमेश्वराचीच पूजा केली पाहिजे.

**दृष्टांत** – लहानपणी एकदा अर्जुन, पितामह भीष्मांच्या मांडीवर बसला होता. भीष्म म्हणाले,"आज शस्त्रास्त्रांची पूजा होईल." अर्जुनाने विचारले "पितामह! पूजा करायला शस्त्र म्हणजे काय भगवंत आहेत?" पितामह म्हणाले, "नाही वेडया! पूजा तर भगवंताचीच होईल पण ह्या उद्देशाने केली जाईल की भगवंतानी मला शस्त्र विद्येत प्रवीण करावे,"

ही भारतीय संस्कृति आहे. शेत नांगरण्याच्या आधी शेतकरी जमिनीला आणि नांगराला नमस्कार करतो.काम चालू करण्याआधी लोहार आपल्या औजारांना हात जोडतो, सावकार लोक जमा-खर्चाच्या वह्यांची पूजा करतात, कारकून लोक कलम-दौतीची पूजा करतात आणि विद्यार्थी आपल्या पुस्तकांना हात जोडून नमस्कार करतात.

सारांश - एका परमेश्वराला समर्पित होऊन प्रत्येक कार्याचा आंरभ करणे. जीवनातील प्रत्येक कार्यात-व्यवहारात; त्या परमेश्वराची आठवण राहिली पाहिजे, हीच आपली संस्कृति आहे. सः म्हणजे तो 'परमात्मा'आणि कृति म्हणजे आपले संपूर्ण कार्य. तेव्हा सर्वांनी एका परमेश्वराचे वा इष्टाचे स्मरण करीत सर्व कार्याचा आंरभ आणि समापन केले पाहिजे.

* * *



## प्रेरक प्रसंग – ६

### स्वार्थ आणि खोटेपणाचा परिणाम


सर्व मुलांनी व विद्यार्थ्यांनी लहानपणापासूनच स्वत:मध्ये सद्‌गुणांचा विकास केला पाहिजे. चांगल्या आचरणाचा पाया घातला पाहिजे. स्वार्थ, कपट,खोटेपणा, ईर्ष्या, अभिमान इत्यादि दुर्गुण आजीवन दु:ख देणारे असतात.भगवान श्रीकृष्णाचा बालसखा असूनसुद्धा मुठभर चण्याच्या मोहापायी सुदाम्याने जन्मभराची आपत्ती ओढवून घेतली.

**दृष्टांत** –जेव्हा भगवान श्रीकृष्ण आपला मोठा भाऊ बलराम ह्याच्याबरोबर सांदीपनी ऋषींच्या आश्रमात (गुरुकुल) आले तेव्हा तेथे आधीपासून असलेल्या सुदामा नावाच्या ब्राह्मण मुलाने त्यांचे स्वागत केले. तो म्हणाला,"गुरु बंधुंनो! तुमचे स्वागत आहे. ह्या पर्णकुटीत मी रहातो, बाजुलाच तुमचेही आसन तयार आहे." तो त्यांच्यासाठी पाणी घेऊन आला. त्यांना पाणी प्यायला दिले आणि म्हणाला, "गुरुजी खूप दयाळू आहेत! गुरुकुलात इतके विद्यार्थी रहातात! तुम्हाला भेटून मला आनंद झाला! कसलीही गरज भासली तरी विनासंकोच मला सांगा, कारण मी सीनियर आहे." .... असे होते त्या काळचे रॅगींग, परिचय करून घेण्याची पध्दत, जिव्हाळा वाढवण्याची शैली.



श्रीकृष्ण म्हणाले, ''सुदामा! आजपासून तू माझा मित्र झालास!'' सुदामा म्हणाला, ''नाही सख्या! हात मिळवून पक्की मैत्री करू नकोस. तू आहेस राजकुमार! मी गरीब ब्राह्मण! मैत्री तर तुल्य व्यक्तींमध्ये होते!'' कृष्ण म्हणाला, ''सुदामा! मैत्रीचा हात तर मी पुढे केला आहे, तेव्हा ती निभावेनही मीच.'' त्यांनी हात मिळविले, कडकडून भेटले व मित्र झाले.

एकदा गुरुमातेने जंगलातून लाकडे आणण्यासाठी कृष्णाबरोबर सुदामाला पाठविले व न्याहारीसाठी दोन मुठी चणे ऐकमेकात वाटून खाण्यासाठी दिले. जंगलात शिरताच मुसळधार पाऊस पडायला लागला. वादळी हवामान आणि थंडीचे दिवस. एका झाडावर कृष्ण आणि एका झाडावर सुदामा आसऱ्यासाठी चढून बसले. सुदामाला भूक लागली, त्याने चण्याचे दोन दाणे तोंडात टाकले. भूक लागल्यामुळे ते चणे त्याला इतके स्वादिष्ट लागले की त्याचा हिस्सा त्याने केव्हाच संपवून टाकला. भूक काही भागली नाही तेव्हा त्याला वाटले की आणखी थोडे चणे खावे, कृष्णाने चणे थोडेच मोजले आहेत. एक-एक करत जेव्हा शेवटचा दाणा तोंडात टाकला तेव्हा श्रीकृष्णाने विचारले, ''सुदामा! गुरुमातेने चणे दिले होते ना?'' सुदामा म्हणाला ''मी तर दोन्ही हातांनी झाडाला पकडले आहे, बहुतेक चणे कोठेतरी पडले.'' कृष्णाने विचारले, ''हे दात का कडकड वाजवितो आहेस?'' सुदामा म्हणाला, ''दुर्बळ ब्राह्मण असल्याकारणाने थंडी वाजत आहे.'' कृष्ण म्हणाला ''ठीक आहे. आजपासून माझे मुठभर चणे तुझ्यावर उधार राहिले.'' सुदामा मनात समजला की श्रीकृष्णाला आपण सगळे चणे खाल्ले हे समजले आहे. गुरुजींनी ही गोष्ट ऐकली तेव्हा ते पश्चात्तापाने म्हणाले ,''सुदामा! तू स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारलीस. श्रीकृष्ण तर भगवंताचे विशुद्ध अंशस्वरूप आहेत! ते आपल्या सर्वांना कृतार्थ करण्यासाठी आलेले आहेत.'' गुरुकुलातील वास्तव्याच्या फक्त चौसष्ठ दिवसांमध्येच श्रीकृष्ण सर्व विद्यांमध्ये पारंगत झाले.



गुरुकुलातील शिक्षण संपवून बाहेर पडताच श्रीकृष्ण झाले द्वारकाधीश! आणि सुदामा झाले दारिद्र्याधीश! दिवसभर भिक्षा मागूनही रात्री पोटभर जेवण मिळत नव्हते. त्याच्या मुलांनाही अर्धपोटी झोपायला लागत होते.

सुदाम्याची वृद्धावस्था आली तरीही परिस्थिती तशीच राहिली, फाटके उपरणे, हातात काठी आणि फरपटलेला प्रपंच. बायको सतत मागे लागायची,''तुमचा बालमित्र श्रीकृष्ण, त्याला एकदा भेटून तर या! कदाचित दारिद्र्य दूर होईल.''

सुदामा द्वारिकेला जायला निघाले. बरोबर तीन मुठी चिवडा बांधून घेतला... श्रीकृष्णाच्या वियोगाने ते भुकेले-तहानलेले चालत चालत पोहोचले द्वारकेला. द्वारपालाला म्हणाले,''बाबा! सांग की बालमित्र सुदामा आला आहे.''... व्दारपालाने वरपासून

खालपर्यंत निरीक्षण केले, 'वा रे बालमित्र!' जाऊन सांगितले,"भगवंत! फाटके उपरणे आणि हातात काठी घेतलला एक किडकिडीत शरीराचा ब्राह्मण दारावर उभा आहे. म्हणतो आहे की मला बालमित्र श्रीकृष्णाला भेटायचे आहे, त्याचे नाव 'सुदामा' आहे." सुदामा!!! ऐकताच श्रीकृष्ण धावत सुटले. मुकुट कोठेतरी पडला! कोठे बासरी तर कोठे हार पडला! त्यांनी जाऊन सुदाम्याच्या पायावर लोटांगण घातले व सख्या सुदाम्याला उचलून आपल्या सिंहासनावर आणून बसविले. परातीतील पाण्याने आणि प्रेमाश्रूंनी त्याचे चरण धुतले.

छप्पन पदार्थांनी सजलेली थाळी आली, लहानपणच्या गोष्टींमध्ये रंगून दोघेही मित्र एकमेकांना घास भरवू लागले, पट्टराण्या वारा घालू लागल्या. अशा प्रकारे मित्र भेटीत १५ दिवस असे निघून गेले की जणू काही दोनच दिवस झाले! पंधरा दिवसातच सुदामाला बाळसे चढले, ते तंदुरुस्त झाले. त्याला आता घरची आठवण येऊ लागली, पण बालमित्र श्रीकृष्णाच्या आग्रहाखातर ते आणखी पंधरा दिवस राहिले.

निरोप देण्याची वेळ आली! भव्य रथात बसवून, चक्रवर्ती सम्राटांप्रमाणे श्रीकृष्णाने मित्र सुदाम्याला नगरात फिरविले. परंतु वेशभूषा तीच होती, फाटके उपरणे आणि हातात काठी. रुक्मिणीसहित सर्व राण्या चवऱ्या ढाळत होत्या. द्वारकेपासून दोन कोसांपर्यंत पुढे जाऊन श्रीकृष्णाने बालमित्र सुदाम्याला शंखध्वनीसहित एका महाराजाप्रमाणे निरोप दिला. राजपरिवार द्वारकेला परतला.

सुदामा आता एकटाच राहिला, खूप चिडला व मनात म्हणाला "छान-छान साडयांच्या अंबारी लावल्या होत्या! चार साडया आपल्या वहिनीसाठी तरी पाठवायला हव्या होत्या! मला दुसरे उपरणे सुद्धा दिले नाही! पैसा-अडक्याची तर गोष्टच सोडा!" तेवढयात त्याला स्वतःकडील पुरचुंडीची आठवण झाली, त्यात त्याने बघितले तर तीन मुठीऐवजी एक मूठ चिवडाच शिल्लक होता. सुदाम्याला काळजी वाटली,"बघा! पठ्ठयाने, दोन मुठी चिवडाही खाऊन टाकला, भूक लागली की दोन मुठी चिवडासुद्धा उपयोगी पडतो" असे म्हणून लागला भुणभुण करायला, "ही बायको मागे लागली... जा! बालमित्राला भेटून या! दारिद्रय दूर होईल!... नाहीतर मी कशाला गेलो असतो? मी तर लहानपणापासून ओळखतो, की तो कपटी आहे!"

सुदाम्याचे प्रायश्चित पूर्ण झाले होते. भुणभुणत जेव्हा तो घरी पोहोचला तर घरच गायब झालेले! म्हणाला "प्रभो! माझी झोपडी कोठे गेली?" नीट बघितले तेव्हा एक भव्य महाल त्याला दिसला, बरोबर तसाच जसा द्वारकेला होता. सुदामा हैराण झाला. कोणाचा महाल आहे हा, इतक्या लवकर कसा तयार झाला?... परंतु माझी मुले कोठे गेली? बायको कोठे आहे? इतक्यात भरजरी वस्त्र, आभूषणांनी नटलेली त्याची बायको खिडकीतून डोकावली. सुदामा पहातच राहिला... तोच रुक्मिणीसारखा शृंगार, गळयात तसाच कौस्तुभ मण्याचा हार. आनंदीत झालेली बायको धावत बाहेर आली व सुदाम्याला महालात घेऊन गेली. सुदामा अवाक् झाला!... द्वारकेसारखाच भव्य महाल, तसेच सिंहासन... तशाच झोपाळयावर सुदामा झुलू लागले, छपन्न प्रकारच्या व्यंजनांचे भोजन मिळू लागले. द्वारकापुरी सारखीच

सुदामापुरी वसली. द्वारकापुरी तर नंतर समुद्रात बुडाली, परंतु सुदामापुरीचे अवशेष आजही बघायला मिळतात.

गुरुकुलात दिलेले वचन- "सुदामा! मैत्रीचा हात मी पुढे केला आहे तेव्हा निभावेनही मीच." भगवान श्रीकृष्णांनी त्याला सर्व काही दिले- अगदी तसे, जसे द्वारकेमध्ये होते. म्हणून आपण सतत सावध राहिले पाहिजे. कोण जाणे आपल्यामधे कोण भगवंताच्या स्वरुपात विराजमान असेल. असे होता कामा नये की आपणही सुदाम्यासारखी चूक करून बसली.

सारांश - भगवंत जेव्हा आपलेसे करतात; कृपा करतात, तेव्हा आपली भगवत्ता देतात. जसे भगवंत, तसाच त्यांचा अनन्य भक्त! म्हणून भगवंत, इष्ट अथवा सद्गुरुंना अनन्य श्रद्धा व भक्तीने शरण जावे. मनामध्ये स्वार्थ, कपट, खोटेपणा, अभिमान तर कदापि नसावा. भगवंत म्हणतात-

**निर्मल मन जन सो मोहिं पावा।**
**मोहिं कपट छल छिद्र न भावा।।**

* * *



# ॥ भगवानुवाच ॥

अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ।।

- गीता, ९/२२

**अनन्य भावाने माझ्या ठिकाणी स्थित असणारे भक्तजन माझ्या परमात्म स्वरूपाचे निरंतर चिंतन करतात, पर्युपासते- अत्यंत एकनिष्ठेने अनन्य भावाने माझी उपासना करतात, त्या सतत माझ्या ठायी अनन्य भावाने युक्त असणाऱ्या पुरुषांचा योगक्षेम मी स्वतः चालवितो. म्हणजेच त्यांनी प्राप्त केलेल्या योगाचे रक्षण करण्याची जबाबदारी मी स्वतः उचलतो. तरीही लोक अन्य देवतांची उपासना करतात.**



- **सृष्टीच्या** आरंभापासून प्रसारित झालेले अविनाशी योग-गीता हेच मानवमात्राचे आदि धर्मशास्त्र आहे.
- **गीता** - संप्रदाय, धर्म व भेदभावापासून मुक्त धर्मशास्त्र आहे. ते आपल्याला स्वर्ग-नरकाच्या द्वंद्वामध्ये न फसविता ईश्वरदर्शन व ईश्वरत्वाची प्राप्ती करवून देते.
- **यथार्थ गीता** - ईश्वरीय प्रेरणेने १९८३ साली प्रकट झालेली यथार्थ गीता ही ५२०० वर्षांनंतर श्रीकृष्णाच्या आशयाचे यथावत् पुनर्प्रकाशन आहे; जी त्यांच्याच अंतःप्रेरणेने लिहीली गेली आहे.

**- स्वामी श्री अड़गड़ानन्द महाराज जी - 'यथार्थ गीते' चे रचनाकार**


**श्री परमहंस स्वामी अड़गड़ानन्दजी आश्रम ट्रस्ट**

न्यू अपोलो स्टेट, गाळा नं. 5 अणि 11 मोगरा लेन,(रेलवे सब-वे च्या जवळ), अंधेरी पूर्व,
मुम्बई - 400069 भारत. फोन : (091-22) 2825 5300
ईमेल : contact@yatharthgeeta.com वेबसाइट : www.yatharthgeeta.com